जाहिरातीचा नमुना -

सत्यमेव जयते

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१
फोन नं. (०२०) २६०५०६४१
ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com
जाहिरात जावक क्रमांक ५३३८/२०१९

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील शासन अधिसुचना दि.३०/०३/२०१३ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे कार्यालय पुणे येथे असुन सदर कार्यालयामार्फत कंत्राटी पद्धतीने भरती करण्यासाठी खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | पद संख्या | पदभरतीचे माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | विधी सल्लागार | १)पहिल्या वर्षी दरमहा रु.५००००/- इतके एकत्रित मानधन<br>२) त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी १० टक्के याप्रमाणे मानधनात वाढ करण्यात येईल. | १ | पीबी-३ रु.१५६०० - ३९१०० + ग्रेड वेतन रु.६६०० या वेतनश्रेणीतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांमधून **अथवा** विधीची पदव्युत्तर पदवी धारण केलेल्या प्रत्यक्ष वकीलीचा १० वर्षे अनुभव असलेल्या व्यक्तीमधून एकत्रित मानधनाने |
| २. | सांख्यिकी अधिकारी | पीबी-२ रु.९३०० - ३४८०० + ग्रेड वेतन रु.४४०० | १ | प्रस्तावित वेतनश्रेणीतून शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांमधून |
| ३. | सहाय्यक प्रशासकीय अधिकारी | पी.बी.-२ रु.९३००-३४८०० + ग्रेड वेतन रु.४३०० | ३ | प्रस्तावित वेतनश्रेणीतून शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांमधून |
| | **एकूण पदे** | | **५** | |

१. सविस्तर जाहिरात मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे www.sahakarayuakta.com या वेबसाईटवर व राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत आली आहे. त्यामध्ये अर्जाचा विहित नमुना दिलेला आहे, त्या विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत.

२. अर्जदारांनी अर्जात त्यांची जन्मतारीख, सेवानिवृत्तीची तारीख, पत्रव्यवहाराचा पत्ता, दुरध्वनी/भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी क्र. इत्यादी बाबी ठळक व अचुक नमुद कराव्यात. तसेच सेवानिवृत्ती वेतनाचे प्रदान आदेशाची छायांकित सत्यप्रत सोबत जोडावी.

३. सहाय्यक प्रशासकीय अधिकारी पदाच्या बाबत संबंधित वेतनश्रेणीमध्ये काम केल्याचा किमान तीन वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच सांख्यिकी अधिकारी पदाच्या बाबत सांख्यिकी अधिकारी या पदावरून उपरोक्त वेतनश्रेणीमध्ये किमान तीन वर्षांचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी आवेदन पत्र सादर करावीत.

४. प्राप्त अर्जाची छाननी करुन तोंडी मुलाखती घेण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक नंतर कळविण्यात येईल.

५. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करावयाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक आरईएम-१५०९/प्र.क्र.५८/२००९/तेरा, दि.१४/०१/२०१० व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील अटी व शर्तीनुसार असतील.

६. अर्जदारांनी त्यांचे अर्ज विहित नमुन्यात ए-४ कागदावर टंकलिखित करुन ते सदस्य सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे, जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे ४११००१ या पत्त्यावर पाठवावेत.

७. सदर जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसांचे आत संबंधीतानी त्यांचे अर्ज पोस्टाने उपरोक्त पत्त्यावर प्राप्त होतील असे पाठवावेत किंवा समक्ष उपरोक्त पत्त्यावर विहीत मुदतीत स्वीकारले जातील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

८. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मासिक पारिश्रमिक अनुज्ञेय असेल.

25 JUN 2019

सही/-
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे

तसेच वेबसाईटवर व प्राधिकरणाच्या नोटीस बोर्डवर दयावयाच्या सविस्तर जाहिरातीमध्ये दयावयाचे अधिक अटी व शर्ती बाबतचा मसुदा खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती -:**

१. राज्य शासकीय विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील विविध विषयांसदर्भात "विवक्षित सेवा/ कामांसाठी" विषयनिहाय **एम्पॅनलमेंट (Empanelment)** करुन सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यात येत आहेत. उदा. आस्थापना विषयक बाबी, निवडणूक कामकाज, लेखाविषयक कामकाज इ. आवश्यकतेप्रमाणे इतर विवक्षित सेवा/कामांचा यामध्ये समावेश करण्यात येईल.

**अ. निवडप्रक्रिया व नियुक्ती –**

१. **नामिकासुचि (Panel)** – करारपध्दतीने कंत्राटी तत्त्वावरील नेमणूका करण्यासाठी विहीत पध्दतीने जाहिरात देऊन प्राप्त अर्जामधून पात्र उमेदवारांची निवड करून नामिकासूची **(Panel)** तयार करण्यात येईल.

२. **नामिकासुचीची (Panel) वैधता** – सदर नामिकासुचीतील व्यक्तींमधुनच करार पध्दतीने कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती करण्यात येईल. सदर नामिकासुचीची वैधता जास्तीत जास्त ३ वर्ष राहील.

३. **बंधपत्र / हमीपत्र** –करार पध्दतीने कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती आदेश प्राप्त झालेनंतर नियुक्ती आदेश अनुषंगाने बंधपत्र/हमीपत्र नोटरी करून कार्यालयास सादर करावे. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात, करार पध्दतीने कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती देताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा, तसेच करार पध्दतीने कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्कांची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करण्यात यावा. तसेच नियुक्ती कालावधीत सोपवलेले काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची असेल. सदर बंधपत्र रूजू होण्यापूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

४. **करार पध्दतीने नियुक्तीची कालमर्यादा** –करार पध्दतीने कंत्राटी तत्त्वावर देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. परंतु अशा नियुक्तीस गुणवत्ता मुल्य निर्धारण अहवाल / निकष आधारित व कामकाजाच्या आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नुतनीकरण करण्यात येईल. मात्र एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

५. **वयोमर्यादा** – शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले मात्र वयाची ६५ वर्ष पुर्ण न झालेले अधिकारी/कर्मचारी करार पध्दतीने कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती करण्यास पात्र असतील मात्र नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती या वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील.

**ब. अर्हता व अनुभव –**

१. संबंधित व्यक्तीने त्या वेतनश्रेणीतील त्या संबंधित पदावर तीन वर्षे कमा केले असले पाहिजे अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे ही पुर्व अट असेल.

२. विधी सल्लागार या पदासाठी अर्ज करणेकरिता रु.१५९००-३९१०० व रु.६६०० या वेतनश्रेणीमधून तीन वर्षे सेवा करणारे पात्र असतील अथवा विधीची पदव्युत्तर पदवी धारण केलेल्या व्यक्तीस प्रत्यक्ष वकीलीचा किमान १० वर्षाचा अनुभव असणारेसुध्दा पात्र असतील.

३. कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करावयाचे सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याचा दृष्टीने सक्षम असावेत. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी. व तसा किमान एम.बी.बी.एस. दर्जाचे डॉक्टरचा दाखला किंवा शासकीय वैदयकीय अधिकारी यांचा दाखला आवश्यक राहील.

४. कंत्राटी तत्त्वावरील नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. तसे अंतिम कार्यालयाचे प्रमाणपत्र / पत्र आवश्यक राहील.

**क. मासिक पारिश्रमिक व भत्ते –**

१. **मासिक पारिश्रमिक** - शासकीय / निमशासकीय सेवा - मासिक पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने कंत्राटी तत्त्वावर नियुक्तीच्या कालावधीसाठी सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ मध्ये नमूद केलेप्रमाणे अनुज्ञेय राहील. तथापि विधी सल्लागार यांना सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडल शासन निर्णय दि.३१.१०.२०१३ व दि.०५.०३.२०१५ मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय राहील.

२. **प्रवास भत्ता व दैनिक भत्ता** :- कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्ती वेळेसच्या वेतनमानास अनुसरून प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

३. कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तिंच्या परिश्रमिकापोटी व भत्त्यांपोटी होणारा खर्च कार्यालयाच्या "कार्यालयीन खर्च" अथवा "कंत्राटी सेवा" या बाबीखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतुन करण्यात येईल.

**ड ) इतर अटी व शर्ती :-**

i. सदर नियुक्ती कंत्राटी पध्दतीने देण्यात येणार असल्याने संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/ सामावुन घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

ii. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या कंत्राटी तत्त्वावरील सेवा पुर्वसूचना न देता व कोणतेही कारण न देता समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

iii. कंत्राटी तत्त्वावरील नियुक्त व्यक्तीस सेवा समाप्त करावयाची असल्यास किमान ३० दिवसांची पूर्वसूचना/ नोटीस देणे बंधनकारक राहील.

iv. कंत्राटी तत्त्वावरील नियुक्त व्यक्तीस अर्जित रजा/वैदयकीय रजा/ विशेष असाधारण रजा किंवा कोणत्याही प्रकारच्या रजा अनुज्ञेय राहणार नाही. तथापि एका वर्षाच्या नियुक्ती कालावधीकरिता जास्तीत जास्त ८ दिवसाच्या किरकोळ रजा अनुज्ञेय राहतील.

v. कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

vi. कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

vii. कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

v. कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील व कामकाज समाधानकारक नसल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्यात येतील.

viii. कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत. (उदा. आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकार देता येणार नाहीत.)

ix. सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी प्रमाणित Pension Payment Order (PPO) प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

सही/-
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे

# विहीत नमुना अर्ज

**अर्ज करावयाच्या पदाचे नाव :**

| | |
|---|---|
| आडनाव | |
| पहिले नाव | |
| वडील / पती चे नाव | |

पुरुष ☐ स्त्री ☐ वैवाहिक स्थिती : विवाहित ☐ अविवाहित ☐

| | |
|---|---|
| पत्रव्यवहाराचा पत्ता :- | कायमचा पत्ता :- |
| दूरध्वनी क्र. | भ्रमणध्वनी क्रमांक |
| ई-मेल : | |

| | | | |
|---|---|---|---|
| जन्म दिनांक | | दिनांक ०१/०७/२०१९ रोजीचे वय | वर्षे :<br>महिने : |
| प्रवर्ग : | वर्गवारी : प्रगत / इमाव/अनु.जाती/अनु. जमाती/ भ.ज.अ/ब/क/ड/ विमाप्र. | | |

| |
|---|
| आधार क्रमांक : |
| पॅन क्रमांक : |
| सेवानिवृत्तीचा दिनांक |
| सेवानिवृत्ती PPO क्रमांक |
| सेवानिवृत्ती वेतन घेत असलेल्या बँकेचे नाव व शाखेचे नाव |
| खाते क्रमांक |

**शैक्षणिक अर्हता/ संगणक व इतर अर्हता**

| अर्हता | बोर्ड/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| SSC | | | | | | |
| HSC | | | | | | |
| पदविका ( असल्यास) | | | | | | |
| पदवी | | | | | | |
| पदव्युत्तर पदवी | | | | | | |
| GDC & A | | | | | | |
| MS CIT/ इतर संगणक | | | | | | |
| टायपिंग | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| इतर अर्हता | | | | | | |
| | | | | | | |

शासकीय सेवेचा तपशील:-

| अ.क्र. | पदनाम | पदावरील सेवेचा कालावधीत | सेवा कालावधीत मिळालेल्या शासकीय पारितोषिकांचा तपशील | सेवा कालावधीत कोणतीही शिस्तभंग विषयक कार्यवाही झाली असल्यास त्याचा तपशील |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

सेवानिवृत्ती वेळेसचा तपशिल-

| अ.क्र. | पदनाम | कार्यालयाचे नाव | वेतन श्रेणी | सेवानिवृत्तीच्या दिनांकास चे मुळ वेतन ग्रेड पे सह | अंशराशीकरण वजा करुन मंजूर झालेले मुळ सेवानिवृत्ती वेतन | मंजूर सेवानिवृत्ती वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त नमुद संपूर्ण माहिती सत्य व अचूक असून निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर उपरोक्त माहितीपैकी कोणतीही माहिती असत्य /चुकीची असल्याचे निर्देशनास आल्यास माझी निवड/ नियुक्ती कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करण्यास पात्र असल्याची आणि त्याबाबत कायदेशीर कार्यवाही होऊ शकते, याची मला पुर्ण जाणीव आहे.

कंत्राटी पदावरील नियुक्तीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. सदर नियुक्ती पूर्णपणे कंत्राटी स्वरुपाची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती असल्याची मला जाणीव असून सदर नियुक्तीमुळे शासनातील कोणत्याही पदावर माझा धारणाधिकार/हक्क निर्माण होत नाही. मी नमुद केलेल्या अर्हता विषयक तपशीलाच्या प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती मला मागणी केल्यास सादर करण्याची हमी मी याद्वारे देत आहे.

स्थळ -
दिनांक -

(उमेदवाराची स्वाक्षरी ) दिनांकसहित

0 संपुर्ण नाव - ---------------------------

- वरील प्रमाणे नमूद सर्व कागदपत्रांच्या छायांकित व स्वक्षांकित प्रती जोडणे आवश्यक
- तसेच सेवानिवृत्तीचा PPO क्रमांक पुस्तिका सेवानिवृत्ती वेळेसच्या कार्यालयाकडील साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक